# धानावरील तुडतुड्यांचे एकात्मिक व्यवस्थापन

१) तपकीरी तुडतुड्यांना प्रतिकारक जातीची लागवड करावी. उदा. पिकेव्ही गणेश,सिंदेवाही-२००१

२) चिखलणीच्या वेळी बांधीत गराडीचे पाने १.५० टन प्रति हेक्टरी या प्रमाणात मिसळावीत त्यामुळे तुडतुड्यांचा प्रादुर्भाव कमी होतो.

३) रोपांची लावणी शिफारसीत अंतरावर करावी. (२० x १५ किंवा २० x २० से.मी.)

४) पट्टा पद्धतीने लागवड करावी म्हणजे १० ओळी किंवा २ मीटर नंतर ३० सेमी अंतर सोडावे.

५) रोपे अतिशय दाट लावू नये, जास्त दाट लागवड झाल्यास तुडतुड्यांचा प्रादुर्भाव वाढण्यास मदत होते.

६) पिकांमध्ये मित्र किटकांच्या संवर्धनासाठी धान बांधावर झेंडू/चवळी पिकांची लागवड करावी.

७) वाजवीपेक्षा नत्र खतांचा वापर करू नये.

८) टेहाळणीसठी प्रकाश सापळयांचा वापर करावा.

९) तुडतुड्यांचा प्रादुर्भाव झाल्यास बांधीतील पाणी सोयीनुसार ३ ते ४ दिवसांसाठी बाहेर सोडावे.

१०) तुडतुड्यांचा प्रादुर्भाव असल्यास नियंत्रणासाठी मेटॅरायझीयम अनिसोप्ली १.१५ टक्के भुकटी (१ x $१०^{८}$ CFU/gm min) Acc.No. MTCC-५१७३ या जैविक बुरशीचा २.५ कि./हे. या प्रमाणात बांधीमध्ये वापर करावा.

११) रासायनिक किटकनाशकाची अनावश्यक फवारणी टाळुन भक्षक व इतर परोपजीवी किटकांचे संवर्धन व संरक्षण करावे.

१२) तुडतुड्यांनी आर्थीक नुकसानीची पातळी ओलांडताच नियंत्रणासाठी बुप्रोफजीन २५ टक्के प्रवाही १६ मीली किंवा इमिडॅक्लोप्रीड १७.८ एस.एल.२.२मीली किंवा फिप्रोनील ५ एस.सी.२० मीली किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५० मीली किंवा इथोफेनप्रॉक्स १० टक्के प्रवाही १० मीली किंवा फ्लोनीकॅमीड ५० टक्के ३ ग्रॅम किंवा थायोमिथाक्झाम २५ डब्लुजी २ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी.